# यावल महाविद्यालयात यशवंतराव चव्हाणच्या परीक्षा

यावल वार्ताहर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ परीक्षा बैठक व्यवस्थेबाबत यावल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नासिक शैक्षणिक वर्ष 2022 /23 च्या केंद्र क्रमांक 5388 Aची बैठक व्यवस्था कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यावल व साने गुरुजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय यावल येथे करण्यात आलेली आहे . तरी दिनांक 29/5/2023 ते 16/6/2023 या कालावधीत एफ वाय बी ए, एस वाय बी ए, टी वाय बी ए, एफ वाय बी कॉम, एस वाय बी कॉम, टी वाय बी कॉम, एम ए, व एम बी ए वर्गाच्या लेखी परीक्षा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यावल व साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात घेण्यात येईल. तरी सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, आपल्याला वेळोवेळी परीक्षेबाबत सूचना महाविद्यालयाच्या फलकावर किंवा आपल्या व्हाट्सअप ग्रुप वर परीक्षेच्या वेळापत्रकाबद्दल कळविण्यात येईल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. असे महाविद्यालयाच्या केंद्र प्रमुख प्राचार्य डॉ.संध्या सोनवणे व केंद्र संयोजक उपप्राचार्य प्रा. ए पी पाटील केंद्र सहाय्यक संतोष ठाकूर यांनी कळविले आहे.

# मुक्त विद्यापीठाच्या परीक्षेला झाली सुरुवात, पहिल्याच पेपरला ११ विद्यार्थी होते गैरहजर



**यावल** | येथील कला, वाणिज्य व विज्ञात महाविद्यालयात सोमवारपासून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाच्या परीक्षा सुरू झाल्या. पहिल्याच पेपरला ११ विद्यार्थ्यांनी दांडी मारली. ही परीक्षा १५ जूनपर्यंत चालेल. पहिला पेपर बीए प्रथम वर्षाचा होता. दुपारी २.३० वाजता सुरुवात झाली. यावल महाविद्यालय तसेच साने गुरूजी विद्यालयात पुढील पेपर करीता बैठक व्यवस्था असेल. बहि:स्थ पर्यवेक्षक म्हणून प्रा.डॉ.मनोज पाटील लक्ष ठेवून आहे. संपूर्ण परीक्षा महाविद्यालयाच्या केंद्र प्रमुख प्राचार्या डॉ.संध्या सोनवणे, केंद्र संयोजक उपप्राचार्य प्रा.ए.पी.पाटील, केंद्र सहाय्यक संतोष ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.